महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका, नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर

दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११

Email ID : collectorpalghar@gmail.com

---

**वाचले:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०.
४) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४
५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३
६) बाजार व जत्रा अधिनियम १८६२ चे नियम ५ ग
७) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/ एस.आर. क्र. ११/२०२० दि.१४/०३/२०२०.
८) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/ एस.आर. क्र. १२/२०२० दि.१६/०३/२०२०.
९) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/बाजारबंद आदेश/ एस.आर. क्र.८६२/२०२० दि.१६/०३/२०२०.
१०) मा.सचिव (गृह), गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील अधिसुचना क्र.४०-३/२०२०-डीएम-आय (ए) दि.२४/०३/२०२०.
११) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना क्रमांक - No:DMU/ २०२०/ CR.९२/DisM-१/दि.२३.०३.२०२०, दि.२४.३.२०२० व दि.२५.३.२०२०.

---

क्र/गृह/का.१/टे.४/कोरोनाविषाणू/मनाईआदेश.मुदतवाढ/एस.आर- १८ /२० दि.३१/०३/२०२०

(शिक्का: जिल्हा दंडाधिकारी पालघर, जिल्हा पालघर)

## आ दे श

ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.३ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली असून शासन अधिसूचनेच्या नियम १० नुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे. करोना विषाणूचा जिल्हयामध्ये प्रार्दुभाव व संसर्ग रोखण्याच्या दृष्टीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३ व बाजार व जत्रा अधिनियम १८६२ चे नियम ५ ग अन्वये आदेश पारीत करण्यात आले आहेत.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.३ अन्वये दिलेल्या निर्देशान्वये या कार्यालयाचे उपोद्घातातील आदेश क्र.७ अन्वये पालघर जिल्हयामध्ये घेण्यात येणाऱ्या सभा, मेळावे, सामाजिक कार्यक्रम, जत्रा, यात्रा, दिंडया, पदयात्रा, ऊरुस, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडास्पर्धा इत्यादींवर दि.३१/०३/२०२० पर्यंत मनाई आदेश पारीत करण्यात आले आहेत.